अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - ३१७ ■ सोमवार दि.४ ऑगस्ट २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 317 ■ Monday Dt. 4 August 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

### रक्तलघवी तपासणीसाठी अवाजवी शुल्क; तपासणीपेक्षा बिल अधिक लूटखसोटीचा प्रकार उघडकीस?

शिवाजीराव हार्ड केअर सेंटर हॉस्पिटलवरील संशयाचे सावट आणखी गडद होत चालले आहे. लिफ्ट अपघाताच्या पार्श्वभूमीवर रुग्णालयातील अन्य अनियमितताही आता समोर येऊ लागल्या आहेत. यामध्ये रक्त लघवी तपासणीसाठी रुग्णांकडून अवाजवी रक्कम आकारण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. सामान्यतः काहीशे रुपयांत होणारी रक्तलघवीची चाचणीसाठी जास्त पैसे आकारली जात असल्याचे काही रुग्णांच्या नातेवाईकांनी सांगितले. यासोबतच संबंधित तपासणीचे तपशीलही स्पष्ट न देणे, किंवा जास्तीचे टेस्ट दाखवून जबरदस्ती बिल वाढवणे, असे प्रकार सातत्याने घडत असल्याचे बोलले जात आहे. या लूटखसोटीत हॉस्पिटलमधील काही डॉक्टर व प्रशासनातील मंडळींची संलिप्तता असल्याचा संशय असून, हा प्रकार उघड झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे.

### जर लिफ्ट कोसळून काही अनर्थ झाला असता, तर जबाबदार कोण? नागरिकांत संतापाची लाट!

शिवाजीराव हार्ड केअर सेंटरमध्ये घडलेल्या लिफ्ट अपघातानंतर संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. मराठा आरक्षणासाठी झगडणारे नेते मनोज जरांगे पाटील हे दुसऱ्या मजल्यावर पेशंटला भेटण्यासाठी जात असताना, लिफ्ट अचानक कोसळली. या धक्कादायक घटनेमागे हॉस्पिटल प्रशासनातील व डॉक्टरांतील हलगर्जीपणा असल्याचा आरोप आता नागरिकांमधून जोर धरू लागला आहे. मनोज जरांगे पाटील यांचा जीव धोक्यात आला असून, यामागे थेट हॉस्पिटल प्रशासनातील निष्काळजीपणा जबाबदार असल्याचा आरोप त्यांच्या समर्थकांनी केला आहे. या घटनेनंतर नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, रुग्णालयाचा परवाना रद्द करावा आणि जबाबदार डॉक्टरांवर गुन्हा दाखल करावा, अशी जोरदार मागणी सोशल मीडियावरून केली जात आहे.

## रुग्णालय प्रशासनाच्या निष्काळजीपणावर प्रश्नचिन्ह, लिफ्टची नियमित देखभाल केली जात होती का? लिफ्टसाठी आवश्यक अधिकृत परवाने होते का? असे अनेक प्रश्न उपस्थित!

# बीडमध्ये मनोज जरांगे पाटील पेशंटला भेटण्यासाठी जात असलेल्या लिफ्टचा अपघात; शिवाजीराव हार्ड केअर हॉस्पिटलच्या हलगर्जीपणाचा पर्दाफाश!

## रुग्णसेवेच्या नावाखाली लूट! रक्तलघवी तपासणीसाठी हजारोंची वसुली; हॉस्पिटल आहे की पैसा कमावण्याचं दुकान?

## खाजगी हॉस्पिटल चालवायचं म्हणजे मनमानी करण्याचा परवाना मिळतो का? आरोग्य विभागाचे नियंत्रण कुठे, हॉस्पिटल प्रशासनावर जबाबदारी कोणाची?

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील शिवाजीराव हार्ड केअर सेंटर हॉस्पिटलमध्ये काल दुपारी एक धक्कादायक प्रकार घडला. मराठा आरक्षणासाठी संघर्ष करणारे नेते मनोज जरांगे पाटील हे आपल्या सहकाऱ्यासोबत हॉस्पिटलच्या दुसऱ्या मजल्यावर एक पेशंटला भेटण्यासाठी लिफ्टने जात असताना, लिफ्ट अचानक तुटून कोसळली. लिफ्ट पहिल्या मजल्यापर्यंत गेल्यानंतर अचानक मोठ्या आवाजासह खाली कोसळली. सुदैवाने या अपघातात मनोज जरांगे पाटील आणि त्यांचे सहकारी दोघेही सुखरूप असून त्यांना कोणतीही गंभीर दुखापत झाली नाही. या प्रकारामुळे रुग्णालय प्रशासनाच्या निष्काळजीपणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. रुग्णालयातील लिफ्टची नियमित देखभाल केली जात होती का? लिफ्टसाठी आवश्यक अधिकृत परवाने होते का? असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत. या घटनेची सखोल चौकशी होऊन जबाबदारांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांमधून केली जात असून, रुग्णालय प्रशासनाने रुग्ण व नातेवाईकांच्या जीवाशी खेळ केला असल्याचा आरोप देखील आता होत आहे. तसेच लिफ्टला कोणतेही अधिकृत परवानगी नसल्याची माहिती समोर येत आहे. या प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी





पान २ वर

### लिफ्ट अपघाताच्या पार्श्वभूमीवर उघड झाली आर्थिक लुबाडणुकीची बाब; शिवाजीराव हार्ड केअर सेंटरवर गंभीर आरोप?

शिवाजीराव हार्ड केअर सेंटर हॉस्पिटलमध्ये मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत घडलेल्या लिफ्ट अपघातानंतर रुग्णालय प्रशासनाच्या कार्यप्रणालीवर नव्याने प्रश्नचिन्ह उभे राहिले आहेत. या अपघातात सुदैवाने मनोज जरांगे पाटील आणि त्यांचे सहकारी बचावले असले तरी, याच हॉस्पिटलविरोधात आता गंभीर स्वरूपाचे आर्थिक लुबाडणुकीचे आरोप समोर येत आहेत. स्थानिक नागरिक आणि रुग्णांच्या नातेवाईकांच्या म्हणण्यानुसार, सदरील हॉस्पिटलमध्ये उपचाराच्या नावाखाली रुग्णांकडून अवास्तव शुल्क आकारले जाते. किरकोळ तपासणीसाठी हजारोंचे बिल लावले जाते, तर काही गंभीर रुग्णांच्या बाबतीत नाकारलेले उपचार दाखवून जबरदस्तीने पैसे वसूल करण्यात येत असल्याचेही आरोप आहेत. रुग्णसेवेच्या नावाखाली सुरू असलेली ही आर्थिक लूट गंभीर चिंतेचा विषय असून, लिफ्ट अपघातासह रुग्णालयाच्या एकूण व्यवस्थापनाची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. मनोज जरांगे पाटील यांनीही या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन प्रशासनाकडून कारवाईची मागणी केली असल्याचे समजते.

### खाजगी रुग्णालयातील अनागोंदी कारभारावर आरोग्य विभागाचे नियंत्रण कुठे; प्रशासन जागं होणार कधी?

घडलेला लिफ्ट अपघात, तपासण्यांचे अवाजवी शुल्क आणि डॉक्टरांची हलगर्जीपणाचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर आता खाजगी रुग्णालयांवरील सरकारी यंत्रणांच्या ढिसाळ नियंत्रणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. रुग्णांची आर्थिक लुबाडणूक, असुरक्षित लिफ्ट्स, निकृष्ट सेवा, बनावट तपासण्या, आणि अपारदर्शक बिलिंग अशा अनेक तक्रारी असूनही, आरोग्य विभाग किंवा जिल्हा प्रशासनाची कोणतीही ठोस कारवाई दिसून आलेली नाही. खाजगी हॉस्पिटल चालवायचं म्हणजे मनमानी करण्याचा परवाना मिळतो का? असा थेट सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. आरोग्य विभागाकडून दरवर्षी रुग्णालय परवाना, उपकरणांची तपासणी, अग्निशमन सुरक्षा, सिव्हिल सर्जनकडून मंजुरी अशा अनेक बाबी तपासल्या जाणं अपेक्षित असतं. मात्र प्रत्यक्षात ही प्रक्रिया कागदापुरती मर्यादित राहिल्याचं स्पष्ट होत आहे.



## लोक जनशक्ती पार्टीच्या उपोषणा संदर्भात तात्काळ निर्णय घ्या अन्यथा मी स्वत: उपोषणाला बसेल : खा. बजरंग सोनवणे

**बीड । प्रतिनिधी**

आंबेजोगाई शहरांमध्ये पुरातत्त्व विहिरीवर अवैधरित्या आंबेजोगाई नगर परिषदेने ताबा दिल्यामुळे शहरात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे त्याच अनुषंगाने माजी आमदार पृथ्वीराज साठे साहेब यांच्या नेतृत्वाखाली सर्वपक्षीयांनी बीड जिल्हाधिकारी यांना एप्रिल महिन्यात पहिली तक्रार दाखल केली त्या अनुषंगाने अनेक वेळा वेगवेगळे निवेदन देण्यात आली त्याचाच एक भाग म्हणून मोठ्या प्रमाणात




आंबेजोगाई शहरात भीक मागून आंदोलन केले व त्यामध्ये जमा झालेली रक्कम आंबेजोगाई नगरपरिषदेला संबंधित विहीर मोकळी करण्यात यावी यासाठी लागणारा खर्च म्हणून देण्यात आली.
त्यातील पुढच्या टप्पा म्हणून लोक जनशक्ती पार्टीच्या वतीने महाराष्ट्र बँकेसमोरील पुरातन विहीर बुजवणाऱ्यांवर आणि संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात यावे. गीर बुजवलेल्या ठिकाणी

पान २ वर

## राशीन येथील महात्मा फुले चौकाच्या फलकाची विटंबना करणाऱ्या समाजकंटकांवर तात्काळ कारवाई करून अटक करावी : ॲड. सुभाष राऊत

**बीड । प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील राशीन येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले चौकाच्या फलकाची तोडफोड करून विटंबना करणाऱ्या जातीयवादी समाजकंटकांना तात्काळ अटक करावी अशी मागणी समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष राऊत यांनी केली आहे. बीड जिल्हा समता परिषदेच्या वतीने जिल्ह्याचे जिल्हाधिकारी




यांच्यामार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांना निवेदन सादर करण्यात आले असून अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात असलेल्या राशीन येथील चौकाला क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले चौकाचे नामकरण सन २०१४ मध्ये ग्रामसभेच्या ठरावाने देण्यात आले होते. महात्मा फुले यांना मानणाऱ्या समाज बांधवांनी या ठिकाणी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले चौकाचा फलक उभारला होता. परंतु दि.२ ऑगस्ट २०२५ रोजी संध्याकाळी काही समाजकंटकांनी या फलकाची तोडफोड करून विटंबना केली आहे. या

पान २ वर







# १ ऑगस्ट ‘लेखन प्रेरणा दिन’ म्हणून घोषित करा

## आमदार अमित गोरखे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त, दिनांक १ ऑगस्ट हा ‘लेखन प्रेरणा दिन’ म्हणून साजरा करण्याची मागणी आमदार अमित गोरखे यांनी मुख्यमंत्र्यांकडे पुणे येथे झालेल्या खंड प्रकाशन कार्यक्रमात केली. अण्णाभाऊंच्या लेखनाचे व्यापक सामाजिक महत्त्व अधोरेखित करत आमदार गोरखेंनी सांगितले की, अण्णाभाऊंचे साहित्य हे केवळ शब्द नव्हते, ते होते अन्यायाविरुद्धचा हुंकार, आणि समाज परिवर्तनासाठीची मशाल!



अण्णाभाऊ साठे यांचे लेखनकार्य त्यांनी ३५ हून अधिक कादंबऱ्या, १५० हून अधिक ललित साहित्य प्रकार, हजारो पोवाडे, लोकनाट्य आणि गीते, तसेच 'फकिरा' सारखी क्रांतीकारी कादंबरी लिहून मराठी साहित्याला नवा सामाजिक आणि श्रमिक वर्गाचा चेहरा दिला. आमदार गोरखेंनी अधोरेखित केले की अण्णाभाऊ साठेंचे साहित्य मूलतः वंचित, शोषित, कामगार, तमाशा लोकांच्या जीवनाशी नाळ जोडणारे होते. त्यांच्या लेखणीतून दलित समाजाचे वास्तव शब्दबद्ध झाले.

जे आज सोशल मीडियावर व्यक्त होत आहेत, तसेच नव्या पिढीतील प्रत्येक तरुण, विद्यार्थी, विचारवंत, लेखक यांना अण्णाभाऊ साठे यांच्या लेखनाचा अभ्यास करता यावा व त्यांच्या लेखणीतून प्रेरणा मिळावी, यासाठी शासनाने हा दिवस लेखन प्रेरणा दिन म्हणून घोषित करावा, असे आवाहन गोरखेंनी केले. अण्णाभाऊ साठे यांची लेखणी म्हणजे सामाजिक परिवर्तनाचे अस्त्र आहे. ही लेखनसंपदा नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे ही शासनाची जबाबदारी आहे, आणि लेखन प्रेरणा दिन ही त्या दिशेने होणारी एक विधायक सुरुवात ठरेल, असा ठाम विश्वासही आमदार अमित गोरखे यांनी व्यक्त केला.

# गेवराई तहसील आवारात मोकाट कुत्र्यांचा मुक्त संचार

## दैनंदिन कामासाठी येणाऱ्या नागरिकांनी घेतला धसका

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई शहरातील मोकाट कुत्र्यांमुळे नागरिक भयभीत झाले आहेत मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी गेवराई नगर परिषदेला अजूनही सवड मिळाली नाही. गेवराई तहसील कार्यालयाच्या पायऱ्यावर दररोज नित्यनेमाने मुक्त संचार पाहायला मिळतोय मोकाट कुत्रे गेवराई तहसील कार्यालयाच्या पायऱ्यावर शांततेने झोप घेत असल्याचे निदर्शनात आलें त्यामुळे दैनंदिन कामकाजासाठी येणाऱ्या नागरिकांनी चांगला धसका घेतला आहे.



याशिवाय मोकाट कुत्रे कोणत्याही क्षणी भुंकत असल्यामुळे चावा घेण्याच्या भीतीपोटी ज्येष्ठ नागरिक व ज्येष्ठ महिला तसेच तहसील कार्यालयात येणारे दिव्यांग बांधव भयभीत झाले आहेत मात्र तहसील कार्यालयाच्या कार्यालयीन प्रशासनाने याबाबत कुठलीही दखल न घेतल्यामुळे आश्चर्याची बाब आहे. मोकाट कुत्र्याने अक्षरशा उच्छाद मांडला असुन तहसील कार्यालयाच्या परिसरातील भाग वाहनाने आधीच पॅक झालेला आहे. यामुळे दैनंदिन कामकाजासाठी तहसीलदार कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना वाहने उभे असणाऱ्या ठिकाणातून निमुळत्या जागेतून बऱ्याच वेळा आक्रमण करावे लागत आहे. या समस्याने नागरिक हैराण झालेले असतानाच त्यात पायऱ्यावर व इतर ठिकाणी मोकाट कुत्र्याच्या बस्तानमुळे नागरिकांची डोकेदुखी वाढली आहे.

तहसील कार्यालयाच्या आवारात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट व संचार सुरू असतानाही त्यांना तिथून पिटळण्याची कोणीही तसदी घेत नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. त्यामुळे कुत्र्यांना बाहेर काढण्यासाठी कोणीही पुढाकार न घेतल्यामुळे परिसरातील वाहने बाहेर काढताच प्रवेशावर कुत्र्यांची झुडी येत असल्याने वाचण्याच्या नादात वाहनधारक भयभीत होऊन रस्त्यावर कोसळत आहे. याकडे तहसील प्रशासन व गेवराई नगरपरिषद कार्यालय यांनी तातडीने लक्ष घालावे, अशी मागणी होत आहे.

# लोकशाहीर डॉ. आण्णा भाऊ साठे जयंती समितीच्या अध्यक्षपदी राहुल आडागळे

**टाकरवन । प्रतिनिधी**

टाकरवन येथे साजऱ्या होणाऱ्या थोर समाजसुधारक, साहित्यरत्न, लोकशाहीर डॉ. आण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती महोत्सव निम्मित जयंती महोत्सव समितीची कार्यकारणी सर्वानुमते जाहीर करण्यात आली. यावेळी अध्यक्षपदी राहुल आडागळे तर उपाध्यक्षपदी राहुल नाटकर तसेच सचिवपदी संजय आडागळे यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांची समाजाच्या वतीने सत्कार करुण पुढील कार्यास सुभेच्या देण्यात आल्या यावेळी सर्व समाज बांधव मोठ्या संख्यने उपस्थित होते.



# एक कोटी वृक्ष लागवड करुन करणार बीडला हरित

## गुरुवारी एका दिवसात ३० लाख वृक्ष लागवड करणार : जिल्हाधिकारी

**बीड । प्रतिनिधी**

हरित बीड अभियान अंतर्गत जिल्ह्यात १ कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट आहे. त्यात येत्या ७तारखेला गुरुवारी एकाच दिवसांत ३० लाख वृक्ष लागवडीचा संकल्प केला आहे. याचा शुभारंभपालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते खंडेश्वरी मंदिर परिसरात वृक्षारोपण करुन करण्यात येणार आहे. या हरित बीड अभियानात जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत केले.



'हरित महाराष्ट्र समर्थ महाराष्ट्र' या धर्तीवर हरित बीड अभियान जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. या अभियानाचा गुरुवारी पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते वृक्षारोपण करुन करण्यात येणार आहे. या अभियान अंतर्गत शासकीय कार्यालय, ग्रामपंचायत हद्दीतील सार्वजनिक जागेसह विविध ठिकाणी वृक्षारोपण करुन एका दावसात ३० लाख वृक्ष लागवडीचा संकल्प करण्यात येणार आहे. यामध्ये सर्व शासकीय कर्मचारी सहभागी होणार आहेत. यात सामान्य नागरीकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे व त्यांच्यामध्ये पर्यावरण संबंधि जनजागृती करण्यात येणार आहे. जिल्ह्यात प्रशासन, तालुका प्रशासन, शासकीय व खासगी संस्था, सेवाभावी संघटना, शाळा व महाविद्यालये यांची सक्रिय भागीदारी असून, सर्व यंत्रणा सज्ज झाल्या आहेत. हरितक्रांतीचा संकल्प घेऊन सुरु झालेल्या या अभियानामुळे परिसराचे पर्यावरणीय संतुलन सुधारण्यास मदत होणार आहे. आ. मुंदडा यांनी या उपक्रमास शुभेच्छा देत नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवावा असे आवाहन केले.



# वाचनाने सजग नागरिक निर्माण होतो : लक्ष्मीकांत देशमुख

**बीड । प्रतिनिधी**

बालसाहित्यिक डॉ. विठ्ठल जाधव यांच्या ‘एकविसाव्या शतकारंभीचे बालसाहित्य’ या समीक्षा ग्रंथास लीलावती भागवत राज्यस्तरीय पुरस्कार पुणे येथे दि. २ ऑगस्ट रोजी ९१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांचे हस्ते प्रदान करण्यात आला.

वाचन ही उन्नत मानवी संस्कृती आहे. चारित्र्यवान पिढीसाठी बालवाचक घडविणे गरजेचे आहे. वाचनातून मुलांची जिज्ञासा आणि आकलन वाढते तर लोकशाही टिकविण्याचे कार्य सजग नागरिक करत असतात आणि वाचन हे सजग नागरिक निर्माण करते असे प्रतिपादन ९१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी यावेळी बोलताना केले. मराठी बाल साहित्यातील उत्कृष्ट निर्मितीसाठी राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आले. रोख रक्कम, प्रमाणपत्र, ग्रंथ भेट देऊन राज्यातील लेखक, प्रकाशक, चित्रकार यांना गौरविण्यात आले. या प्रसंगी लता मंगेशकर सभागृह, मॉडर्न महाविद्यालय, पुणे येथे अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेचे अध्यक्ष माधव राजगुरू कार्यवाह अनिल कुलकर्णी प्रसाद भडसावळे प्राचार्य राजेंद्र झुंजारराव, संजय ऐलवाड सचिन बेंडभर, राजेंद्र जेधे, तात्यासाहेब भराटे, संजीवनी जाधव, राहुल काशिद, ऋषिकेश जाधव, ओंकार जेधे यांचेसह राज्यभरातील लेखक कवी, प्रकाशक यांची उपस्थिती होती.

# नगर रोड, शाहूनगर रोडने घेतला मोकळा श्वास!

## बीड शहर वाहतूक शाखेने काढले रस्त्यावरील अडथळे तर वाहनांवर दंडात्मक कारवाई



**बीड । प्रतिनिधी**

शहरातील नगर रोड, राजीव गांधी चौक, अंबिका चौक ते सम्राट चौक रस्त्यावर असलेले अडथळे काढून अस्तव्यस्त उभ्या वाहनांवर वाहतूक शाखेने आज कारवाईचा बडगा उगारला. यामुळे या भागातील रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला आहे. ही कारवाई जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी अधिकारी सपोनि सुभाष सानप यांच्या नेतृत्वाखाली केली. शहरातील अनेक व्यावसायिक आपल्या दुकानांपुढे फलक तसेच इतर काही साहित्य लावतात.

तसेच त्यापुढे रस्त्यावर दुचाकी, चारचाकी असे विविध वाहने लावली जातात. यामुळे या वर्दळीच्या रस्त्यावर गर्दी होऊन वाहतूक कोंडीचा प्रश्न बिकट झाला होता. याची सतत ओरड होत असल्याने जिल्हा वाहतूक शाखेचे सपोनि सुभाष सानप यांनी कर्मचाऱ्यांसह नगर रोड, राजीव गांधी चौक, अंबिका चौक, सम्राट चौक या भागात कारवाई करीत दुकांना समोरील फलक व विविध साहित्य काढून घेतले तसेच रस्त्यावर अस्तव्यस्तपणे उभे असलेले दुचाकी, चारचाकी या वाहनांवर दंडात्मक कारवाई केली. यामुळे नागरीकांमधून समाधान व्यक्त करीत वाहतूक शाखेचे आभार मानले जात आहे. सपोनि सुभाष सानप यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, कर्माचारी अजिनाथ मुंडे, वसीम शेख, त्रिंबक कुडके, दत्ता कदम यांनी केली आहे.

# लोकशाही पत्रकार संघाची नवचैतन्य भरारी

## संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य यांची आष्टी दौऱ्यात घोषणा!

**आष्टी । प्रतिनिधी**

लोकशाही पत्रकार संघाचे महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष भागवत बी.बी.वैद्य यांनी आष्टी येथील शासकीय श्रमगृहास भेट देत पत्रकार संघटनेच्या बांधिलकीचा नवा अध्याय लिहिला.त्यांच्या उपस्थितीत आष्टी तालुक्यातील नवनियुक्त पदाधिकाऱ्यांची घोषणा करण्यात आली. या नव्या कार्यकारिणीमुळे पत्रकार संघटनेला नवसंजीवनी मिळणार असून, ग्रामीण पत्रकारिता अधिक सक्षम आणि गतिमान होणार आहे, असे मत अध्यक्ष भागवत वैद्य यांनी व्यक्त केले.



आष्टी तालुका कार्यकारणी नवनिर्वचित पदाधिकारी यांच्या निवडी लोकशाही पत्रकार संघाचे महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष भागवत बी बी वैद्य, राष्ट्रीय उपाध्यक्ष संदीप जाधव, प्रदेश अध्यक्ष प्रताप साळूंखे, प्रदेश सचिव गणेश जगदाळे, प्रदेश कार्याध्यक्ष अयुब खान पठाण, उपाध्यक्ष अनिस कुरेशी, साजेद सय्यद, आजाद शेख यांच्या आदेशानुसार बीड जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब साबळे यांनी आष्टी येथे शासकीय श्रमगृहामध्ये भेट देऊन आष्टी तालुक्यातील लोकशाही पत्रकार संघाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष तथा तालुका पत्रकार अण्णासाहेब साबळे, तालुका उपाध्यक्ष रवींद्रनाथ ठाकूर, सचिव अशोक शिवाजी माने, सहसचिव प्रशांत बांगर, कार्याध्यक्ष अशोक धुंदकर, प्रसिद्धीप्रमुख हर्षल खांडवे, कायदेशीर सल्लागार म्हणून अर्चना चंद्रशेखर पाटील, उपाध्यक्ष लोणी विभाग बाबू देवकर, संघटक चंद्रकांत मोरे, प्रसिद्धी प्रमुख आदिनाथ ठोंबरे देऊळगाव विभाग, नवीन नियुक्ती सलीम गफूर पठाण मीडिया प्रमुख आष्टी शहर, सदस्य रंगनाथ काकडे आदींची नव्याने निवड करण्यात आली. लोकशाही पत्रकार संघाची नवचैतन्य भरारी – संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य यांची आष्टी दौऱ्यात घोषणा! या नव्या कार्यकारिणीमुळे पत्रकार संघटनेला नवसंजीवनी मिळणार असून, ग्रामीण पत्रकारिता अधिक सक्षम आणि गतिमान होणार आहे, असे मत अध्यक्ष भागवत वैद्य यांनी व्यक्त केले.

पान १ वरून...

### बीडमध्ये मनोज जरांगे पाटील पेशंटला भेटण्यासाठी जात असलेल्या लिफ्टचा

स्वतः हस्तक्षेप करून सदरील हॉस्पिटल वर कडक कारवाई करावी अशी जोरदार मागणी नागरिकांकडून केली जात आहे. सदरील घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र या घटनेने हॉस्पिटल प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा आणि विनयभंगाचा पर्दाफाश केला आहे. लिफ्ट सारख्या महत्त्वाच्या यंत्रणेचा वापर परवानगीशिवाय आणि देखभालीशिवाय सुरू असल्याने भविष्यात मोठा अनर्थ होऊ शकतो त्यामुळे या प्रकरणाची चौकशी केवळ प्रशासनापूर्ती मर्यादित न ठेवता, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याची गंभीर दखल घ्यावी आणि संबंधित हॉस्पिटल वर प्रशासनावर कटोरात कठोर कारवाई करावी अशी जनतेची मागणी आता तीव्र होत आहे. हे केवळ अपघात नाही तर जीवितहानीच्या प्रयत्नासारखा आहे. अशा शब्दांत संताप्त प्रतिक्रिया उमटत आहेत जोशींवर तात्काळ गुन्हेगारी कारवाई झाली नाही तर आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात येत आहे.

### लोक जनशक्ती पार्टीच्या उपोषणा संदर्भात तात्काळ निर्णय घ्या

अनधिकृत पणे दुकाने बांधकाम परवाना देणाऱ्या नगर परिषदेच्या मुख्य अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी. महाराष्ट्र बँकेसमोरील दुकाने वाढून ती विहीर पुनर्जीवित करण्यात यावी. अशा तीन मागण्या घेऊन लोक जनशक्ती पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष अशोक काळे पाटील हे उपोषणास बसले आहेत उपोषणाचा आज पाचवा दिवस असताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी उपोषण स्थळी भेट दिली व अंबाजोगाई मुख्य अधिकारी यांना उपोषणा संदर्भात ठोस निर्णय घ्या असे आदेश दिले अन्यथा मी सुद्धा अंबाजोगाई नगरपरिषदेच्या भ्रष्ट कारभार संदर्भात जिथे बसायचे आहे. तिथे उपोषणाला बसेल असा सल्लाही मुख्याधिकारी यांना खासदारांनी दिला यावेळी माजी आमदार पृथ्वीराज साठे साहेब राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे अंबाजोगाई तालुका अध्यक्ष अमर भैया देशमुख लोक जनशक्ती पार्टीचे मराठवाडा प्रदेशाध्यक्ष राजेश भाऊ वाहुळे शिवसेनेचे मदन परदेशी व इतर मान्यवर उपस्थित होते.

### राशीन येथील महात्मा फुले चौकाच्या फलकाची विटंबना करणाऱ्या

समाजकंटकांवर तात्काळ कार्यवाही करून अटक करण्यात यावी अन्यथा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. यावेळी समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष राऊत, श्री संत शिरोमणी नरहरी महाराज जयंती महोत्सवाचे संस्थापक ॲड. संदीप बेदरे, समता परिषदेचे तालुकाध्यक्ष सावता काळे, शहराध्यक्ष निखिल शिंदे, युवा नेते नितीन राऊत, नाभिक समाजाचे युवा नेते अजिंक्य सुरवसे, वडार समाजाचे शरद विटकर, माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष धनंजय काळे, महेश व्यवहारे, ग्रामपंचायत सदस्य अजय राऊत यांच्यासह समता सैनिक व महात्मा फुले प्रेमी नागरिक उपस्थित होते.

# माझी शाळा माझे उपक्रम : शितल जावळे


**ही आवडते मज मनापासून शाळा**
**लाविते लळा ही जशी माऊली बाळा**
**हसऱ्या फुलांचा बाग जसा आनंदी**
**ही तशीच शाळा मुले इथे स्वच्छंदी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भूगाव क्रमांक २, ही पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्याच्या प्रवेशद्वारावर वसलेली एक महत्त्वपूर्ण शैक्षणिक संस्था आहे. २०१० साली स्थापन झालेली ही शाळा, पुण्यापासून अवघ्या १५ किलोमीटर अंतरावर असून, परिसरातील मुलींना गुणवत्तापूर्ण प्राथमिक शिक्षण प्रदान करत आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ही केवळ एक इमारत नसून, परिसरातील विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याचा पाया रचणारी संस्था आहे. २०१० मध्ये स्थापन झाल्यापासून, शाळेने स्थानिक समुदायाच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. पुणे शहरापासून जवळ असल्यामुळे, शहरी सुविधांचा लाभ घेण्याची संधी असली तरी, शाळेने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना त्यांच्या सांस्कृतिक आणि सामाजिक वातावरणाशी जोडून ठेवत शिक्षण दिले आहे.ही केवळ एक शिक्षण संस्था नसून, ती या भागातील मुलांच्या स्वप्नांना पंख देणारी आणि त्यांना उज्ज्वल भविष्याकडे घेऊन जाणारी एक आशा आहे.

शालेय मूलभूत क्षमता विकसन: प्रस्तावना आणि स्वरूप

शालेय मूलभूत क्षमता विकसन म्हणजे विद्यार्थ्यांना त्यांच्या प्राथमिक शिक्षण काळात आवश्यक असलेली पायाभूत कौशल्ये, ज्ञान आणि दृष्टिकोन विकसित करण्यास मदत करणे. ही कौशल्ये केवळ शैक्षणिक प्रगतीसाठीच नव्हे, तर त्यांच्या भावी आयुष्यात यशस्वी होण्यासाठी आणि एक जबाबदार नागरिक बनण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहेत. सोप्या भाषेत सांगायचे तर, मुलांच्या शिक्षणाचा मजबूत पाया तयार करणे म्हणजे शालेय मूलभूत क्षमता विकसन होय.

भारताच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (छएझ २०२०) मध्ये मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान यावर विशेष भर देण्यात आला आहे. या धोरणानुसार, तिसरीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी मूलभूत साक्षरता (वाचणे आणि लिहिणे) आणि संख्याज्ञान (गणित आणि अंकगणित) प्राप्त करणे हे राष्ट्रीय प्राधान्य आहे. यामागे हेच मुख्य कारण आहे की, जर मुलांनी प्राथमिक स्तरावर ही मूलभूत कौशल्ये आत्मसात केली नाहीत, तर त्यांना पुढील अभ्यासक्रमात अडचणी येतात आणि त्यांच्या शिक्षणात कायमस्वरूपी अंतर निर्माण होते.



शालेय मूलभूत क्षमता विकसन केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित नाही. यात मुलांच्या सर्वांगीण विकासाचा विचार केला जातो, ज्यात त्यांची तार्किक विचार करण्याची क्षमता, समस्या सोडवण्याची कौशल्ये, सर्जनशीलता, संवाद कौशल्ये आणि सामाजिक-भावनिक विकास यांचा समावेश होतो. ही क्षमता मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करते आणि त्यांना शिक्षणाच्या प्रवासात सक्रियपणे सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करते.

स्वरूप : शालेय मूलभूत क्षमता विकसनाचे स्वरूप बहुआयामी आहे आणि ते खालील प्रमुख घटकांवर आधारित आहे: मूलभूत साक्षरता : वाचन : यामध्ये अक्षरे, शब्द आणि सोपी वाक्ये वाचण्याची क्षमता, मजकूर समजून घेण्याची आणि त्यातून अर्थ काढण्याची क्षमता समाविष्ट आहे. मुलांना गतीने आणि अचूकपणे वाचता येणे महत्त्वाचे आहे. लेखन : अक्षरे, शब्द आणि साधी वाक्ये स्पष्टपणे लिहिणे, विचारांना लिखित स्वरूपात मांडणे आणि व्याकरण व शुद्धलेखनाचे मूलभूत नियम समजून घेणे यात अपेक्षित आहे. भाषिक समज : ऐकलेले किंवा वाचलेले समजून घेऊन त्यावर प्रतिक्रिया देण्याची क्षमता. संख्याज्ञान : निष्कर्ष : शाळेत राबवलेल्या विविध शैक्षणिक, बौद्धिक, सांस्कृतिक, क्रीडा, मूल्यवर्धन, आणि डिजिटल उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडून आला. मूलभूत साक्षरता, गणिती कौशल्ये, संवाद क्षमता आणि जीवनकौशल्ये यामध्ये विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय प्रगती केली. शाळेतील वातावरण आनंददायी, प्रगतीशील व सक्रिय झाले. पालक सहभाग, शिक्षकांचे नवोपक्रम, स्थानिक समाजाचा पाठिंबा आणि आधुनिक साधनसंपत्तीचा वापर यामुळे शिक्षण अधिक प्रभावी व समावेशक झाले. शाळेने विद्यार्थी केंद्रित, मूल्याधिष्ठित आणि भविष्याभिमुख शिक्षण दिले आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, जिज्ञासा आणि नेतृत्वगुण निर्माण करण्याचे काम यशस्वीरीत्या पार पाडले.

**शाळा म्हणजे हसणं, खेळणं, बागडण...**
**आणि दिवसागणिक शिकत राहणं।**
**पाटी, पेन्सिल, पुस्तकांचा गोतावळा,**
**अशी माझी शाळा जी देते अमृत फळा।**

**शितल जावळे**
शाळा – जिल्हा परिषद प्राथमिक शाळा
भूगाव क्र २ (मुलींची)
तालुका मुळशी, जिल्हा पुणे

# कान्नापूर येथे विद्युत वायरला चिकटल्याने युवकाचा मृत्यू

**सिरसाळा । प्रतिनिधी**

विद्युत वायरला चिकटल्याने एका युवकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना धारुर तालुक्यातील कान्नापूर येथे घडली आहे. लक्ष्मण डिगांबर कुकडे वय २५ रा. कान्नापुर ता.धारुर असे मयत युवकाचे नाव व पत्ता आहे. दिनांक २ ऑगस्ट रोजी रात्री ११ वाजताच्या दरम्यान यातील मयत लक्ष्मण हा शेतातील आकड्यावर गेला. त्या ठिकाणी विद्युत बोर्डा नजीक काही तरी करत असतांना त्याचा हात उघड्या विद्युत वायराला लागला असेल आणि चिकटून जागीच मृत्यू सदरील युवक झाला असेल असे म्हटल्या जात आहे. हा प्रकार लोकांना माहित झाल्या नंतर त्या ठिकाणी लोकांनी गर्दी केला होता. गावभर वाऱ्या सारखी बातमी पसरली, घटना समजताच सिरसाळा पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहचले. रात्री उशीरापर्यंत सिरसाळा पोलीस ठाण्यात या प्रकरणी कसलीही नोंद नव्हती.



# लहान मुलांना त्यांच्या गाड्यांची स्वप्न पूर्ण करण्यासाठी गाडीवाला उद्योग समूह उभारला : अशोक काळे, अमोल खटके



**आष्टी । प्रतिनिधी**
तालुक्यातील भोजेवाडी सारख्या ग्रामीण भागात राहून नगर येथे स्थायिक झालेले अशोक आणि अमोल यांनी काहीतरी नगर ठिकाणी उद्योग भरावा हे स्वप्न उराशी बाळगून त्यांनी गाडीवाला उद्योग समूह उभारला या उद्योगसमूहाचे उद्घाटन आई सौ.कौशल्या रामनाथ काळे, रामनाथ काळे, सुनिता महादेव खटके, महादेव खटके यांच्या शुभहस्ते मोठ्या थाटात करण्यात आले. आई-वडिलांचे हस्ते फीत कापून हा उद्घाटन सोहळा संपन्न झाला.
यावेळी सचिन (आबा) कोतकर, संपत (दादा) बारस्कर (शहर जिल्हाध्यक्ष), इंजिनियर दगडू मामा शेंडगे (ओबीसी जिल्हा अध्यक्ष), सनी भैय्या जाधव (रुबाब उद्योग समूह), पियुष भाऊ सजगणे (रिलस्टारची गाडीवाला उद्योग समूह), मच्छिंद्र गोफणे (सरपंच भोजेवाडी), अमोल भैया लगड (जीवनधारा प्रतिष्ठान अध्यक्ष) बंटी (भाऊ) भिंगारदिवे (टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष), राहुल काळे (पोलीस उपनिरीक्षक), आबासाहेब पालवे, गिताराम पालवे, अनिल पालवे, संजय पारखे, शिवाजी गोफणे, शंकर लकडे, बाळासाहेब खटके, कृष्णा खटके, बाळू पारखे, विठ्ठल लकडे, गौतम गोफणे, महादेव पालवे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.
यावेळी बोलताना अमोल खटके म्हणाले की, मनाशी जिद्ध बाळगली तर कोणताही उद्योग करता येतो फक्त जिद्द आणि चिकाटी व्यवसायात महत्त्वाची आहे. या गाडीवाला उद्योग समूहाचे उद्घाटन सत्यम शिवम अपारमेंट बालिका आश्रम रोड जाधव मळा अहिल्यानगर या ठिकाणी झाले. यावेळी संपत दादा बारस्कर, दगडू मामा शेंडगे, अमोल लगड, बंटी भाऊ भिंगार दिवे यांचे समयोजित भाषणे झाले. आभार प्रदर्शन पियुष समजणे यांनी मांडले. उपस्थित मान्यवरांचा अशोक काळे, अमोल कटके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# प्रतिष्ठित आय.एल.एस. विधी महाविद्यालय पुणे येथून ॲड.अविनाश सोळुंके कायद्याची पदवी घेऊन उत्तीर्ण!

**बीड । प्रतिनिधी**
ॲड. अविनाश आत्माराम सोळुंके, रुईलिंबा (ता. व जिल्हा बीड) येथील रहिवासी, यांनी पुण्यातील नामांकित आय.एल.एस. विधी महाविद्या लय येथून ङङ.इ. ची पदवी यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. अत्यंत साध्या आणि ग्रामीण पार्श्वभूमीतून आलेल्या ॲड. अविनाश यांची ही शैक्षणिक कामगिरी अत्यंत प्रेरणादायी आहे. वडिलांचे लहानपणीच निधन झाल्याने कुटुंबाची सर्व जबाबदारी आईवर आली, घरातील आर्थिक परिस्थिती हलाखीची असूनही त्यांनी शिक्षण सोडल नाही. त्यांनी शिक्षणाबरोबरच सामाजिक कार्यातही सक्रीय सहभाग घेतला आणि स्वबळावर आपल्या शिक्षणाची वाटचाल सुरू ठेवली.



आता विधी व्यवसायात पाऊल ठेवताना ॲड. अविनाश न्यायव्यवस्थेच्या माध्यमातून समाजासाठी कार्य करण्याच्या संकल्पाने पुढे जात आहेत. त्यांचा विश्वास आहे की, कायदा ही केवळ व्यवसायाची वाट नसून समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे. दुर्बल, वंचित आणि न्यायासाठी झगडणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला आधार देण्याचा आणि न्याय मिळवून देण्याचा त्यांचा प्रामाणिक प्रयत्न राहणार आहे.
आय.एल.एस. विधी महाविद्यालय, पुणे हे भारतातील एक नामांकित विधी शिक्षणसंस्था असून, येथून सर्वोच्च न्यायालयाचे तीन मुख्य न्यायाधीश आणि महाराष्ट्राचे तीन मुख्यमंत्री यांनी कायद्याचं शिक्षण घेतलं आहे. सर्वोच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश यशवंत चंद्रचूड, माझी मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण, माझी मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख, माझी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, माझी उप-मुख्यमंत्री स्व. गोपीनाथ मुंडे, माजी कॅबिनेट मंत्री बाळासाहेब थोरात, माजी मंत्री मोहन धारीया, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश बी. जी. कोळसे पाटील आणि माझी खासदार स्व. राजीव सातव यांसारखे अनेक नामवंत राजकीय, सामाजिक आणि कला क्षेत्रातील नामवंत व्यक्ती घडले आहेत. अशा महान परंपरेतून विधी शिक्षण घेतलेल्या ॲड. अविनाश यांना अभिमान आहे यांनी आता विधी व्यवसायात प्रवेश केला आहे.

# डॉ.क्षमा उपलेंचवार लंडनच्या आंतरराष्ट्रीय पदवीने सन्मानित

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**
डॉ.क्षमा उपलेंचवार यांना लंडन येथील रॉयल कॉलेज ऑफ ऑब्सटेट्रिशियन्स एंड गायनेकॉलॉजिस्टस मध्ये फोर्ब्ज ही प्रतिष्ठेच्या आंतरराष्ट्रीय पदवीने नुकतेच सन्मानित करण्यात आले आहे. सदरील पदवीदान समारंभ लंडनच्या रॉयल कॉलेज येथे पार पडला. वैद्यकीय क्षेत्रातील सर्वोत्तम आंतरराष्ट्रीय पदवी त्यांना प्राप्त झाली आहे. पदवीदान रॉयल कॉलेजच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या रानी ठक्कर यांच्या हस्ते त्यांचा सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमासाठी देश विदेशातील अनेक तज्ज्ञ आणि रॉयल कॉलेजचे पदाधिकारी उपस्थित होते.




डॉ. क्षमा या मूळच्या अंबाजोगाई येथील असून निवृत्त प्राध्यापक रामकृष्ण देवशटवार आणि राधिका देवशटवार यांच्या कन्या आहेत. त्यांचे विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षण महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात अग्रेसर असलेल्या योगेश्वरी शिक्षण संस्थेत झाले. त्यांनी मुंबईतील सायन हॉस्पिटल येथे एम.बी.बी.एस. आणि जे.जे. रुग्णालय येथे डीजीओ पदवी प्राप्त केली. त्यानंतर पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालय येथे डी एन बी ही नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन ही पदवी संपादन केली. त्या पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात स्त्री रोग तज्ज्ञ व वंध्यत्व निवारण तज्ञ म्हणून कार्यरत आहेत. त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील पदवी प्राप्त झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# सहशिक्षिका मसरत सुलताना अन्सारी यांच्याकडून गरजूवंत विद्यार्थ्यांना ५०० वह्या वाटप

**बीड । प्रतिनिधी**
शहरातील भालदार पुरा स्थित मिल्लीया उर्दू प्राथमिक शाळा (मुलींची) येथील सहशिक्षिका मसरत सुलताना अन्सारी यांनी स्वखर्चाने शाळेतील गरजूवंत १२५ विद्यार्थ्यांना ५०० वह्यांचे वाटप केले. आवश्यक असलेल्या वह्या आपल्या शिक्षिकेकडून मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर मोठ्या प्रमाणात आनंद फुलल्याचे दिसून आले.
उर्दू भाषेतील नामांकित अंजुमन ईशात-ए-तालीम या संस्थेचे भालदार पुरा येथील मिल्लिया प्राथमिक शाळेत मसरत सुलताना अन्सारी या दोन वर्षापूर्वीच सहशिक्षिका पदावर रुजू झाल्या आहेत. त्यांनी विद्यार्थ्यांना ज्ञानदान करीत असताना पाहिले की, अनेक विद्यार्थी असे आहेत ज्यांना शिक्षण घेताना आवश्यक असलेले वह्या, रजिस्टर नाहीत. त्यांनी ही बाब हेरून स्वखर्चाने ५०० वह्या व रजिस्टर शाळेत आणले आणि ते संस्थेच्या सचिव खान सबिहा बेगम यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापिका मिर्झा कनिज़ फातेमा आणि पर्यवेक्षिका रिज़वाना बेगम कादरी यांच्या प्रमुख उपस्थितीत व हस्ते १२५ विद्यार्थ्यांना वाटप केले. यावेळी घेण्यात आलेल्या एका छोटेखानी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नजमुसहेर आणि सबीया खतीब या दोन्ही सहशिक्षिकांनी केले. वह्या, रजिस्टर वाटपाचा हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हाजरा बाजी, फैसल सर, शाज़ीया बाजी, निशात बाजी, सना बाजी, अरशीया बाजी, तसलीम बाजी, सबा फातेमा बाजी, सबा अंजुम बाजी यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनीही परिश्रम घेतले.



# आष्टीचे भुमिपुत्र बजरंग बनसोडे यांची मुंबई येथे पोलीस उप आयुक्त पदावर नियुक्ती

**आष्टी । प्रतिनिधी**
आष्टी तालुक्यातील सुपुत्र व सध्या राष्ट्रीय तपास यंत्रणा (छख-) दिल्ली येथे केंद्रीय प्रतिनियुक्तीवर असलेले अपर पोलीस अधीक्षक बजरंग बनसोडे यांची मुंबई येथे पोलीस उप आयुक्त पदावर गृह विभागाने गुरुवारी काढलेल्या आदेशानुसार नियुक्ती करण्यात आली आहे.



त्यांनी आजवर मिरज, अहमदनगर, नाशिक, नवी मुंबई इत्यादी ठिकाणी उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून यशस्वी पणे कामगिरी केली आहे. तसेच बुलढाणा येथे अप्पर पोलीस अधीक्षक म्हणून त्यांनी कारकीर्द गाजवली होती. त्यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक मोठे गुन्हे उघडकीस आणून पोलीस खात्याची मान उंचावेल अशी कामगिरी केली आहे. त्याची दखल घेऊन केंद्रीय गृह विभागाने त्यांना सन २०२२ मध्ये तीन वर्ष राष्ट्रीय तपास यंत्रणा मधे तीन वर्षे काम करण्याची संधी दिली होती. तिथेही आपल्या कार्याचा ठसा उमटवत देशसंरक्षणा साठी सर्वोच्च अशी कामगिरी केली आहे. त्यांनी अनेक ठिकाणी धाडसी कारवाया करून अट्टल गुन्हेगारांना जेलची हवा दाखवली आहे. त्याबद्दल त्यांना महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी गौरविण्यात आले आहे. आता मुंबई येथे पोलीस उप आयुक्त पदावर गृह विभागाने जबाबदारी दिली आहे.

# माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांची आ.सुरेश धस यांचे निवासस्थानी सदिच्छा भेट

**आष्टी । प्रतिनिधी**
महाराष्ट्र राज्याच्या राजकारणातील दिग्गज घराणे समजले जाणारे राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांनी आमदार सुरेश धस यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.
आष्टी राज्य परिवहन महामंडळात आगार वाहतूक नियंत्रक मोहिते परिवाराचे नातेवाईक असलेले संजय संभाजीराव निंबाळकर यांच्या सेवापूर्ती कार्यक्रमासाठी ते प्रामुख्याने उपस्थित होते. त्यानंतर त्यांनी आमदार सुरेश धस यांच्या निवासस्थानी भेट दिली.
यावेळी जुन्या स्मृतींना उजाळा देण्यात आला. विजयसिंह मोहिते पाटील यांचे आजोळ असलेले ब्रह्मगाव हे आष्टी तालुक्यात असून आष्टीच्या जवळ आहे. यावेळी आ.सुरेश धस यांनी मोहिते पाटील यांच्याशी संवाद साधताना जिल्हा परिषदेचा उपाध्यक्ष नंतर आष्टी मतदार संघाचा लोकप्रतिनिधी म्हणून जेव्हा जेव्हा आपल्याकडे आलो तेव्हा आपल्याकडे या राज्याचे उपमुख्यमंत्रीपद, ग्रामविकास खाते असताना मतदार संघातील कामांना भरघोस निधी उपलब्ध करून दिला. या आठवणींनी उजाळा देत आपल्या अद्वैतचंद्र निवासस्थानी आ.सुरेश धस यांनी विजयसिंह मोहिते पाटील यांचा यथोचित सन्मान केला. यावेळी राजेंद्र सिंह भोसले, राजाभाऊ निंबाळकर, पत्रकार सचिन रानडे उपस्थित होते.



# लोकप्रिय आकाशवाणी आणि रंगमंचीय निवेदक मंगेश वाघमारे यांचे दु:खद निधन

**बीड । प्रतिनिधी**
गेली ३५ वर्षे आपल्या आकाशवाणी आणि मंचीय निवेदनातून रसिकांची सांगीतिक अभिरुची घडवणारे आणि सौंदर्यात्मक आस्वादनाच्या माध्यमातून संगीत प्रसार करणारे लोकप्रिय आकाशवाणी आणि रंगमंचीय निवेदक मंगेश वाघमारे यांचे २ ऑगस्ट २०२५ रोजी निधन झाले.पुणे येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.
मंगेश वाघमारे यांचा अल्पपरिचय म्हणजे जन्म.१९ जुलै १९६० अंबड जि.जालना येथे.मंगेश वाघमारे हे मूळचे मराठवाड्यातील अंबडचे.शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण अंबडच्या केंद्रीय प्राथमिक विद्यालय, जिल्हा परिषद प्रशाला, समर्थ विद्यालय आणि श्री मत्स्योदरी महाविद्यालय इथे झाले. अंबडच्या श्री.दत्तजयंती संगीत महोत्सवात आस्वादनात्मक निवेदन करताना त्यांच्यातील निवेदक-निरुपकाने आकार घेतला. गायनाचार्य पंडित गोविंदराव जळगावकर यांच्याकडून मिळालेल्या सखोल मार्गदर्शनाने त्यांच्या निवेदन शैलीला सखोलता आणि उंची लाभली. संगीत शास्त्र, कला, विद्या यांचा अभ्यास करत असतानाच मातृभाषा मराठीसह हिंदी, उर्दू आणि इंग्रजीचा भाषाशैली आणि सादरीकरण संदर्भातील अभ्यास त्यांनी केला आहे. प्रारंभी काही वृत्तपत्रातून पत्रकारिता केली. विपुल संगीतसमीक्षा लेखन लोकमत, लोकसत्ता, मराठवाडा, अजिंठा इ.वृत्तपत्रातून केले.



मंगेश वाघमारे १९८६ ते २०२० या कालावधीत आकाशवाणीवर कार्यरत होते. ते आकाशवाणी पुणे केंद्रावर ३३ वर्षे आणि औरंगाबाद केंद्रावर २ वर्षे निवेदक पदावर वैशिष्ट्यपूर्ण सेवा करून निवृत्त झाले. आकाशवाणीवरच्या अनेक कार्यक्रमातून आपल्या प्रासादिक शैलीत आस्वादन, विश्लेषण, विवेचन आणि निरुपण करत अनेक कार्यक्रमांना त्यांनी अविस्मरणीय केले. 'महक', 'परिमल', फोन इन संभाषणात्मक कार्यक्रम, रसिकांच्या उपस्थितीत झालेले कार्यक्रम, संवाद, श्रुतिका, मुलाखती यातून अत्यंत रसाळपणे त्यांनी सांगीतिक संकल्पना रसिकांसमोर विशद केल्या. या साठी सातत्याने शास्त्रीय, सुगम, चित्रपट संगीत या बरोबरच कर्नाटक, पाश्चात्य, पौर्वात्य संगीत आणि प्रादेशिक लोकसंगीताचा व्यासंग त्यांनी जपलेला होता. भारतीय आणि विदेशी संगीत वाद्ये हा त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय, त्यामुळे चित्रपट संगीतातील वाद्यवृंद संयोजन हा विशेष व्यासंग त्यांनी जपलेला होता. संगीतकार, संगीत संयोजक, वादक आणि जाणकार यांच्या प्रत्यक्ष सहवासात राहून मिळवलेल्या ज्ञान आणि माहितीमुळे त्यांच्या सादरीकरणाला एक वेगळं परिमाण आहे, यामुळेच जाणकार रासिकांचा विशेष लोभ त्यांना लाभत आला आहे. आपल्याकडून घडलेली कलाक्षेत्राची सेवा ही परमेश्वर आणि गुरुकृपेमुळेच शक्य झाली असा त्यांचा दृढ विश्वास आहे. गुरुवर्य गायनाचार्य पंडित गोविंदराव जळगावकर यांच्या अमृतमय सहवास आणि मार्गदर्शनामुळे जीवनाला आकार, सुगंध लाभला अशी त्यांची भक्ति भावना होती. गुरुबंधू पं.पद्माकर थिगळे, संगीत व्यासंगी चुलते चिंतामणराव वाघमारे आणि प्रख्यात धृपद धमार गायक गुरुवर्य उस्ताद सईदुद्दीन डागर यांचे अत्यंत मौलिक सांगीतिक मार्गदर्शन त्यांना लाभले. तबला, हार्मोनियम वादनासह संतूर वादनाचे कौशल्य त्यांनी गुरूंकडून आत्मसात केले. मराठी भाषा आणि पत्रकारितेचे मार्गदर्शन डॉ.धुंडिराज कहाळेकर यांच्याकडून लाभले. वडील माधवराव वाघमारे यांनी त्यांना उर्दूविषयक मार्गदर्शन केले त्याचा सांस्कृतिक जीवनात खूप मोठा प्रभाव पडला. समीक्षात्मक आणि आस्वादनात्मक सादरीकरणातून निवेदनाची एक स्वतंत्र शैली त्यांनी निर्मिली आहे. अनेक दिग्गज गायक-वादक, नर्तकांच्या तसेच चित्रपट संगीत क्षेत्रातील महान कलाकारांच्या कार्यक्रमात सहभागी होवून रसिकांच्या श्रवण-आस्वादनाला अनन्य परिमाण दिले आहे. संगीतकार राम कदम, प्रभाकर जोग, अनिल मोहिले, प्यारेलालजी, पंडित हृदयनाथ मंगेशकर संगीत संयोजक श्यामराव कांबळे, इनॉक डेनियल्स, मनोहारी सिंग इ.सह अनेक कार्यक्रमातून सहभाग घेतला आहे. शास्त्रीय संगीत क्षेत्रातील अनेक दिग्गज कलावंतांच्या मैफलीचे संचालन करण्याचे भाग्य मंगेश वाघमारे यांना लाभले आहे. राग संगीताच्या माध्यमातून त्यांनी केलेले चित्रपट आणि ललित संगीताचे विवेचन आणि वाद्यवृंद विषयक विश्लेषण यामुळे अनेक रसिकांना नवी वाट सापडण्यास मदत झाली. संगीतकार, वाद्ये आणि वादक हा त्यांच्या संशोधनात्मक अभ्यासाचा प्रमुख विषय आहे. प्रख्यात संगीतकार, व्हायोलिन वादक प्रभाकर जोग यांच्या गाणारे व्हायोलिन या कार्यक्रमाच्या शंभर हून अधिक प्रयोगात मंगेश वाघमारे यांनी निवेदन केले होते. मंगेश वाघमारे हे जेष्ठ पत्रकार महेश वाघमारे यांचे मोठे बंधू होत.

# माजलगाव तालुक्यात दुचाकी चोरीचे सत्र सुरूच; नागरिक भयभीत

**माजलगाव । प्रतिनिधी**
माजलगाव तालुक्यात दिवसाढवळ्या दुचाकी चोरीच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ होत असून, त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सार्वजनिक ठिकाणी उभ्या केलेल्या दुचाकी गाड्यांवर चोरट्यांचे लक्ष असून, तालुक्यातील विविध भागांतून दुचाकी चोरीच्या अनेक घटना घडत आहेत. ३ दिवसांखाली चोरट्यानी किटीआडगाव परिसरातील रामेश्वर गायकवाड या युवकाची MH ४४ L १७५६ ही गाडी १२ वाजता खळगे याच्या निवासी शाळेच्या शेजारील शाहापुर आडगाव शीवाजवळील रस्त्यावरील लॉक तोडून दुपारच्या वेळेस दुचाकी चोरी झाल्याची तक्रार ग्रामिण पोलिसांत दाखल केली आहे.

**पोलीस प्रशासन गाफील?**
दुचाकी चोरीच्या वाढत्या घटनांवर नागरिकांनी नाराजी व्यक्त केली असून, पोलीस गस्त अपुरी पडत असल्याची टीका केली जात आहे. अनेक भागांमध्ये ना सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत आहेत, ना सुरक्षित सुविधा उपलब्ध आहे. नागरिकांसाठी सूचना आपली दुचाकी नेहमी लॉक करा. शक्य असल्यास वाहनावर ॲलार्म सिस्टीम बसवा. घराबाहेर किंवा दुकानासमोर सीसीटीव्ही बसवावा. संशयास्पद हालचाली दिसल्यास त्वरित पोलिसांशी संपर्क साधावा.

**पोलिसांची कार्यवाही**
पोलिसांनी या चोरीच्या घटनांचा तपास सुरू केला असून, काही ठिकाणी विशेष गस्त वाढविण्यात आली आहे. लवकरच चोरांच्या मुसक्या आवळल्या जातील, असा विश्वास पोलीस निरीक्षकांनी व्यक्त केला आहे.





**बीड :** दि.२९ जुलै २०२५ वार मंगळवार रोजी आरोग्य विभागातील आरोग्य सेवक तथा मराठवाडा अध्यक्ष आरोग्य विभाग नितीन महुवाले यांचे वडील कै. भारत जानकीराम महुवाले यांचे आजारपणामुळे वयाच्या ८३ वर्षी निधन झाले. निधनानंतर आज माझ्या घरी सात्वनपर डॉ. योगेश क्षिरसागर (बीड विधानसभा अध्यक्ष) यांनी भेट दिली त्यांच्या सोबत सरपंच अमोल बागलाने आदी उपस्थित होते.

# पत्रकारितेत जम वाढलेले भागवत तावरे नेत्यांच्या बैठकीत राजकीय पटलावर प्रदेश प्रवक्तेपदी निवड

## पत्रकारितेच्या माध्यमातून लोकप्रिय झालेले लोकपत्रकार तावरे राजकारणाच्या परिघात बीड च्या मातीतील नेता

**कोळगाव । प्रतिनिधी**
भागवत तावरे पत्रकारितेची दिड दशकांपासून लिखाणात झोकून काम करणारा अवलिया... गावच्या शिवारापासून ते जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात दैनिक लोकाशा च्या माध्यमातून चौफेर फटकेबाजी क्रॉसलाईन लिखाणातून ओळख जाणारे व्यक्तीमत्व.... लेखन करित असताना शेतकरी संकटात अडचणीत पाहिला अन्यायाने खचला त्याची बाजू घेऊन मग ते नैसर्गिक संकट असो किंवा अस्मानी संकटाशी झुंजत राहणे ब्रीदवाक्य ठरले होते... त्याचबरोबर अतिवृष्टी पाऊसाने सांगली सातारा येथील पुरग्रस्ताना मदतीसाठी राबविलेली मदत असो.. किंवा कोरोना काळात जिओजिंदगी सेवा देणाऱ्या विशेष करून जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून दिलेली डॉ अशोक थोरातांची वैद्यकीय सेवा, पोलिस अधिकारी, रुग्ण अन् नागरिकांना पोटासाठी गाव खेड्यातील माय माऊलींच्या हाताने थापलेल्या लाखो भाकरी शहरात आणून वाटप करणारा हा भागवत ची किमया शैलीतील सरस ठरते.
बातमी लिखाणात अ अडल्याचे न नडल्याचे काम असो किंवा माझ्यासारख्या चा अनेकांचे फोन केल्याबरोबरच करतो म्हणून सांगतो.. मग ते जिल्हाधिकारी कार्यालय असो किंवा कोणत्याही शासकीय कार्यालयात म्हणा किंवा सरकारी दवाखान्यात फोन करून काम करणारे भागवतराव जसे लोकांच्या मनात रुजवले वाढवलेले आहे.वेटिंग असलेल्या फोनवरून दिसले. तसे राजकारणी नेत्यांना त्यांचे लिखाण जास्त करून सलत असे.. काही वेळा तर लिखाणाचा राग म्हणून लोकाशा सारख्या ऑफिस ची तोडफोड करण्यापर्यंत हात धरलेले आहे तर... दरम्यान पत्रकारितेच्या माध्यमातून नेहमीच संबंध तोडणारे असताना ही समाजकारण, राजकारण, शैक्षणिक, राज्य पातळीवरुन राष्ट्रीय स्तरावरील घटना, बातम्या विषयासंदर्भात लेख शाहू फुले आंबेडकर विचारधारेत वाचनीय आहेत याचबरोबर हिंदू मुस्लिम, वाद न करता ओबीसी मराठा वाद न करता किंवा दलित उच्चवर्णीय समाजात दंगलीच्या कळा थोपविण नेहमीच सलोखा अबाधित ठेवण्यासाठी वाढण्यासाठी नेहमीच चर्चेचा केंद्रबिंदू राहिलेले आहे. स्थानिक निवडणूक असो किंवा लोकसभा विधानसभा निवडणुकीत मात्र चर्चेत पण कोणत्या जाती गटांचे अन् कोणत्या नेते पक्षांचं हे मात्र नेहमीच टोमण्याचा विषय असलेले पत्रकारिता लिखाणात शब्द प्रपंचात वैभवात शुन्याची साथ अर्थ व्यवहारात नेहमीच समाजसेवकापासून ते अधिकारी पुढारी लोकप्रतिनिधी, आमदार खासदार नव्हे तर पालकमंत्री यांची नेहमीच दिमतीला सहवासाचा प्रवास गगणात फिरुन आलेला आहे.



चला असो ह्या प्रवासाने बीड, केज, गेवराई आणि परळी वैजनाथ, आष्टी च्या नेत्यांच्या बैठकीत जम वाढलेले तावरे राजकीय पटलावर मुंबईपुणे सारख्या शहरातील संधी ठोकरणारे आजपर्यंत संपादक विजयराज बंब यांच्या शब्द वैभवाची शिदोरी जमवून कौटुंबिक कक्षा ओलांडून शिवसेना असो...काँग्रेस भाजप असो... किंवा आंबेडकरी असो एआईएमआईएम, मनसे विद्यार्थी आघाडी, छोट्या मोठ्या संघटनेच्या प्रमुख नेते मान्यवरांबरोबर वाढलेला पत्रकारिता जनाधार उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रवक्ते पद देऊन राज्याच्या पटलावर लोकपत्रकार लोकप्रिय पत्रकार म्हणून भागवत तावरे भविष्यात बीड च्या मातीतील नेताम्हणून ओळखला जाणारा आहे. राजकीय पटलावर हे सर्व सामान्यांच पोर प्रस्तावित नेत्यांच्या परिघात दाखल होणे खरोखरच नवलाचा विषय नाही तर नवीन आदर्श निर्माण होण्यासाठी निवड ठरावी यासाठी तुम्ही कार्यरत राहावं.. तुमच्या या निवडीसाठी हार्दिक शुभेच्छा.

# पिंपरनई येथील स्मशानभूमीची अवस्था मरणासन्न; निवारा नाही, पाण्यातुन वाट काढावी लागते

## निदान मरणानंतर मृतदेहाची विटंबना टाळण्यासाठी अजितदादांनी डीपीसीमधुन निधी द्यावा

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील पिंपरनई येथील स्मशानभूमीची दुरावस्था झाली असुन १५ वर्षांपूर्वी बांधलेल्या बांधकाम ढासळलेल्या अवस्थेत असुन वादळी वाऱ्यासह पावसाने पत्रे उडुन गेल्याने पावसाळ्यात अंत्यविधी करण्यासाठी पाऊस थांबण्याची तसेच तलावाच्या शेजारी स्मशानभूमी असल्याने पावसाळ्यात पाण्यातुन वाट काढत अंत्यविधी करावा लागतो त्यामुळे प्रशासनाने नविन स्मशानभूमी बांधण्यासाठी लक्ष द्यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सुनिल भोसले यांनी केली आहे.



**निवारा नसल्याने अंत्यविधी दुसऱ्या दिवशी करावा लागला; प्रशासनाला गांभीर्य नाही : कॉ. सुनिल भोसले**

बीड तालुक्यातील पिंपरनई गावची लोकसंख्या जवळपास २००० असुन गावात दलित सामाजाची ३५ घरे आहेत. गावची स्मशानभूमी गावतलावा शेजारी असल्याने व १५ वर्षांपूर्वी बांधण्यात आलेले पत्र्याचे शेड वादळी वाऱ्यासह पावसाने उडुन गेल्याने निवारा नाही. पावसाळ्यात तलावात पाणी साचल्याने पाण्यातुन वाट काढत अंत्यविधीसाठी जावे लागते. दोन वर्षांपूर्वी पावसाळ्यात पावसाची झड सुरूच राहिल्याने निवारा नसल्याने साहेबराव भोसले यांचा अंत्यविधी दुसऱ्या दिवशी करावा लागला. ज्यांना शेती आहे ते शेतात अंत्यविधी करतात परंतु भुमिहिन आणि गोरगरीब दलित समाजातील लोकांना अंत्यविधीसाठी मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागते. मात्र प्रशासकीय अधिकाऱ्यांना याचे गांभीर्य नसल्याची खंत सुनिल भोसले यांनी व्यक्त केली.

**निदान मृत्युनंतर मृतदेहाची विटंबना टाळण्यासाठी पालकमंत्री अजितदादांनी स्मशानभूमीसाठी निधी द्यावा : डॉ.गणेश ढवळे**

बीड जिल्ह्यातील १३९४ गावापैकी तब्बल ६५६ गावांमध्ये अजुनही स्मशानभूमीच उपलब्ध नाही तर काही गावांमध्ये स्मशानभूमीचे बांधकाम ढासळलेल्या व पत्रे उडाल्याने निवारा नसुन दुरावस्थेत आहे. मागासवर्गीय समाजातील व्यक्तींचा अंत्यविधी रोखल्याने शासकीय कार्यालयात मृतदेह आणुन ठेवल्याच्या घटना घडलेल्या आहेत यातुन सामाजिक ताणतणाव निर्माण होत असुन वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांनी बीड जिल्ह्यातील स्मशानभूमीची दुरुस्ती व नविन बांधकामासाठी जिल्हा नियोजन मधुन निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.आयुष्यभर जगण्यासाठी संघर्ष केल्यानंतर निदान मृत्युनंतरही मृतदेहाची विटंबना थांबविण्यासाठी प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.



# वैद्यनाथ बँक निवडणुकीत ना.पंकजाताई मुंडेचा परळीत मतदार, कार्यकर्त्यांशी संवाद

**परळी । प्रतिनिधी**

राज्याच्या पर्यावरण व मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आज वैद्यनाथ नागरी सहकारी बँकेच्या निवडणूक प्रचारार्थ सभासंद मतदार व कार्यकर्त्यांशी बैठक घेऊन संवाद साधला. लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलच्या विजय संकल्प यावेळी करण्यात आला.

बँकेचे अध्यक्ष विनोद सामंत यांच्या निवासस्थानी नामदार पंकजाताई मुंडे यांनी सभासद संबोधित केले. चेअरमन विनोद सामान यांच्यासह व चेअरमन रमेश कराड, विकासराव टोपे, शांतीलाल मुंडे, वैजनाथ जगतकर, बाजीराव धर्माधिकारी, वैजनाथ सोळंके, शांतीलाल जैन, जुगल किशोर लोहिया, सूर्यभान मुंडे, सतीश मुंडे, माऊली फड आदी यावेळी उपस्थित होते. वैद्यनाथ बँकेविषयी आपल्या सर्वोच्च मनात एक वेगळी भावना आहे. लोकनेते मुंडे साहेब यांनी बँकेच्या प्रवृत्तीकडे वाटचाल केली. परळीच्या प्रगतीत बँकेचा सिंहाचा वाटा आहे. बँकेला पाहून येसू शिखरावर घेऊन जाण्यासाठी लोकनेते गोपीनाथ मुंडे जनसेवा पॅनलच्या सर्व उमेदवारांना विजयी करण्यासाठी मेहनत घ्या असे आव्हान नामदार पंकजाताई यांनी केले.

**चार उमेदवार बिनविरोध: १३ जागेसाठी १० तारखेला मतदान**

वैद्यनाथ बँकेच्या १७ जागांसाठी ही निवडणूक होत असून लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलचे चार उमेदवार अगोदर बिनविरोध निवडून आले आहेत. यात माजी खा.डॉ. प्रीतम ताई मुंडे. माधुरी मेन कुदळे. व प्राध्यापक विनोद जगतकर यांचा समावेश आहे. उर्वरित १३ जागावर सर्वश्री विनोद सानप, रमेश कराड, प्रकाश जोशी, संदीप लाहोटी, डॉक्टर राजाराम मुंडे, प्रवीण देशपांडे, महेश्वर निर्मळे, विजय वाकेकर, अमोल दुबे, कुलभूषण जैन, राजेंद्र लोमटे, सुशांत लोमटे, मनोहर कलंत्री हे निवडणूक लढवत आहेत.

# उपमुख्यमंत्री अजित पवारांचा दौरा फक्त शोभेचा की लोकांच्या व्यथा ऐकण्याचा? : शेख इमरोज शरीफ

**बीड । प्रतिनिधी**

शहरात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा दौरा होत असताना संपूर्ण प्रशासन एकदम क्शन मोडमध्ये आलंय. जे रस्ते महिनोनमहिने तुटलेले होते, जिथं नाल्यांचं पाणी रस्त्यावर वाहतं होतं, जिथे कुत्रे, डास आणि घाणीचं साम्राज्य होतं ते ठिकाण आता एकदम चमकायला लागलंय. हे पाहून जनता विचारतेय. उपमुख्यमंत्री येतात तेव्हा शहर चमकतं, मग उरलेल्या दिवसांत हे सगळं व्यवस्था कुठं झोपलेली असते? सगळीकडे फक्त बॅनर लागलेत, नेत्यानं नेता स्वागतासाठी धावतायत. पण कोण मांडणार आहे सामान्य जनतेचे प्रश्न? शहरातील अनेक भागांमध्ये अजूनही कचऱ्याचे ढीग आहेत. रस्ते खड्ड्यांनी भरलेले आहेत. नाल्यांची दुरवस्था आजही तशीच आहे.



नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा प्रचंड तुटवडा भासत आहे. हा दौरा म्हणजे केवळ 'शोभेचा तमाशा' आहे का? की खरोखरच लोकांच्या व्यथा ऐकून त्यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न? सगळ्यात मोठा प्रश्न – गटाचे स्थानिक नेते, नगरसेवक, पदाधिकारी... हे खरोखर अजित पवार यांना शहराच्या खरी स्थितीची माहिती देतील का? की ते फक्त बॅनर लावून आपली 'ताकद' दाखवण्याचा प्रयत्न करणार? अजित पवार साहेब, बीड शहर खूप काही बोलतंय, प्रश्न विचारतंय – ऐकाल का? मंत्री, आमदार, खासदार, सगळ्यांनी एकदा तरी बीड शहराच्या गल्ली-बोळांतून चालून बघावं... एकदा तरी जनतेच्या डोळ्यांत डोकावावं... एकदा तरी केवळ भाषणं नाही, तर जनतेचं मन ऐकावं... कारण ही जनता केवळ मतांच यंत्र नाही – ती तुमच्यावर विश्वास ठेवून जगते, लढते आणि आजही वाट बघतेय... एकदा तरी – हो, एकदाच जनतेसाठी वेळ काढा आणि जनतेचं खरं दुःख ऐका...! अशी कळकळीची मागणी आझाद पत्रकार शेख इमरोज शरीफ त्यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

# आष्टी तालुक्यातील हॉटेल, ढाब्यासह अनेक ठिकाणी राबतात चिमुकले हात!

**दौलावडगाव । प्रतिनिधी**

ग्रामीण भागासह शहरातील अनेक हॉटेल, ढाबे, बांधकाम, वडापावचे गाडे, चायनीजच्या गाड्यांवर, बालकामगारांना राबवून घेतले जात असताना कामगार कार्यालयाने या बालकामगार प्रकरणाकडे कानाडोळा न करता धाडसत्राच्या माध्यमातून व्यावसायिकांवर कारवाई करावी अशी मागणी केली जात आहे. आष्टी तालुक्यात विविध ठिकाणी चिमुकल्या हातून धोकादायक ठिकाणी काम करवून घेतले जात आहे. कामगार कार्यालयाकडून नियमितपणे सर्वेक्षण आणि धाड सत्र होत नसल्याने शेकडो बालक दिवसरात्र राबत आहेत.

दुसरीकडे सरकार या संदर्भात जाणीवपूर्वक सर्वेक्षण होत नसल्याने मोठ्या प्रमाणावर बाल कामगारांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे.



त्यामध्ये परप्रांतीय मुलांचा भरणा सर्वाधिक आहे. अनेक ठिकाणी बाल कामगारांची पिळवणूक होत असल्याचे चित्र उघडपणे दिसून येते. मात्र, शासकीय यंत्रणा उदासीन असल्याचे दिसून येत असुन कारवाई करण्याकडे अधिकारी का कानाडोळा करत आहेत. कि डोळ्यावरची झोपच जात नाही हे विशेष आहे. घरची आर्थिक स्थिती बिकट असल्याने अनेक मुले काम करतात. त्यांच्या अज्ञानाचा फायदा उठवत, त्यांना अल्प पगारात राबविले जाते. नातेवाईक किंवा मालक मंडळी मुलांकडून जबरदस्तीने काम करवून घेतात. कायदाची अंमलबजावणी होत नसल्यानेच बालकांना कामास जुंपले जाते. बाल कामगारांचे उच्चाटन होण्यासाठी त्यांच्या शिक्षण, आहार आणि निवासी सोय होणे अत्यावश्यक आहे. बाल कामगारांची पिवळवणूक थांबविण्यासाठी शासकीय यंत्रणा उदासीन असल्याचे चित्र आहे. आष्टी तालुक्यातील वास्तव भयानक असुन बालकामगार अधिकारी यांनी त्वरित कारवाई करावी अशी मागणी शिवक्रांती सेनेचे युवक प्रदेश अध्यक्ष दिपक सोनवणे यांनी केली आहे.

# बीडमध्ये शेतकरी कामगार पक्षाचा वर्धापन दिन उत्साहात; मेळाव्यातून दिसली ताकद

**बीड । प्रतिनिधी**

शेतकरी कामगार पक्ष व क्रांतिसिंह नाना पाटील शेतकरी विकास प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने भाई मोहन गुंड यांच्या पुढाकारातून बीडमध्ये यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात रविवारी पुरस्कार वितरण सोहळा, क्रांतिसिंह नाना पाटील व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी डाव्या विचाराचे विविध पक्षांचे नेते, कार्यकर्ते, सामाजिक चळवळीतील प्रतिनिधी एकत्र आले होते. या वर्धापन दिनानिमित्तच्या मेळाव्यातून शेतकरी कामगार पक्षाची ताकद दिसली.



कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी खासदार बजरंग सोनवणे हे होते. पक्षाचे ध्वजारोहण राज्य चिटणीस मंडळ सदस्या चित्राताई गोळेगावकर यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रा.उमाकांत राठोड, ज्येष्ठ नेत्या सुशिला मोराळे, माजी आमदार उषा दराडे, शेकापचे राज्यचिटणीस मंडळ सदस्य मोहन गुंड, जिल्हा चिटणीस विष्णूपंत घोलप, राजकुमार घायाळ (हमाल मापाडी महामंडळ), ॲड.अजय बुरांडे (माकप), ज्येष्ठ नेते इकबाल पेंटर, चंद्रकांत चव्हाण (शिक्षक आघाडी), भाऊराव प्रभाळे (भाकप), राजेश घोडे (आझाद क्रांती सेना), रोहिदास जाधव (एसएफआय), प्रा.पंडित तुपे (युक्रांद), गणेश मस्के (संभाजी ब्रिगेड), ॲड.राहुल वायकर (विभागीय संभाजी ब्रिगेड), नितीन सोनवणे (पँथर सेना), सुभाष लोणके (डीपीआय), ॲड.शिवाजी कांबळे (समाजवादी पक्ष), अशोक येडे (आप) आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी अनेक मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक भाई मोहन गुंड यांनी केले, सूत्रसंचालन व्याख्याते राहुल गिरी यांनी केले तर आभार प्रदर्शन ड.नारायण गोले पाटील यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भाई बापुसाहेब साळुंके, नागेश मिठे, अर्जुन सोनवणे, अशोक रोडे, संदीप पन्हाळे, अंगद मोहिते, मुकुंद शिंदे यांच्यासह इतरांनी प्रयत्न केले. कार्यक्रमास शेकापचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या विचारांना अभिप्रेत कार्य करू : खा.बजरंग सोनवणे**

शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई मोहन गुंड यांनी केजमध्ये सुरू असलेला क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नावाचा पुरस्कार सोहळा बीडमध्ये घेऊन आले ही कौतुकाची बाब आहे. क्रांतिसिंह नाना पाटील यांचे कार्य चंद्र-सूर्य असेपर्यंत जनमानसात जिवंत राहील. त्यांच्या विचारांना अभिप्रेत असे कार्य खासदार या नात्याने करण्याचा मी प्रयत्न करीन, असेही त्यांनी सांगितले. पुढे बोलताना त्यांनी भाई मोहन गुंड यांच्या कार्याचे कौतुक करून ते केजचे भूमिपुत्र असल्याने त्यांचा अभिमान वाटतो असे गौरवोद्गार काढले.

**पुरस्कार प्राप्त मान्यवरांचा सन्मान**

अरुण जाधव (राजकीय), राजाभाऊ देशमुख (कृषी), सुधाकर देशमुख (पर्यावरण), डॉ. संदीप तांबारे (आरोग्य), शाहीर राजेंद्र कांबळे (सांस्कृतिक), कॉ.राजकुमार कदम (शैक्षणिक), उज्वला पडलवार (कामगार), ह.भ.प. श्यामसुंदर सोन्नर (सांप्रदायिक), संपत मोरे (पत्रकारिता), जागृती अमरजीत तिवारी (क्रीडा) या मान्यवरांचा उल्लेखनीय कार्याबद्दल सन्मान करण्यात आला.

# आष्टी तालुक्यात खुलेआम मुरूमांची चोरी; अवैध उत्खननाने महसूलला लाखो रूपयांच्या तोटा

**दौलावडगाव । प्रतिनिधी**



मशिन, टॅक्टरच्या साह्याने कसलीही परवानगी न घेता गेल्या अनेक दिवसांपासून तालुक्यातील ठिकठिकाणी खुलेआम मुरूमाचे उत्खनन केले जात असताना उघड्या डोळ्यांनी याकडे पाहणारा महसुल विभाग नेमक करतोय काय असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी यांच्या नजरा चुकवून लाखो रूपयांचा महसुलला तोटा होत असताना वरिष्ठाचे याकडे दुर्लक्ष असल्याचे दिसुन येत आहे. यामुळे मोठमोठ्या डोंगरासह, पहाडी, भुईसपाट होऊ लागले आहेत.

आष्टी तालुक्यातील गायरान, इनाम, सार्वजनिक वनविभाग, डोंगरपटे यासह ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणावर गेल्या अनेक दिवसांपासून स्थानिक महसुल विभागाकडून कसलीही परवानगी न घेता मशिनच्या माध्यमातून टॅक्टर मध्ये टाकून दिवसाढवळ्या मुरूमाची चोरी केली जात आहे. वास्तविक मुरूम उत्खनन किवा त्याची वाहतूक करायची असेल तर महसुल कडून तशी रितसर परवानगी घेणे बंधनकारक आहे. पण तालुक्यात रस्ता काम सोडता कोणत्याही ठिकाणी परवानगी घेतली जात नसल्याने प्रशासनाला लाखो रूपयाचा भुर्दंड सहन करावा लागत आहे. तहसीलदार, नायब तहसीलदार, मंडळधिकारी, तलाठी हे प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी नेमक काय करतात याचा मेळ लागत नाही. मुरूम उत्खनन करणाऱ्यांना कोणाचे अभय आहे. हा प्रश्न उपस्थित केला जात आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून याची चौकशी होऊन मुरूम उत्खननाच्या ठिकाणी पंचनामे करण्याचे आदेश देऊन संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी शिवक्रांती सेनेचे युवक प्रदेश अध्यक्ष दिपक सोनवणे यांनी केली आहे.

# एसटी कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना मिळणार शिष्यवृत्ती

## एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष, व्यवस्थापकीय संचालकांनी दिले निर्देश

**पात्रुड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात कार्यरत कर्मचाऱ्यांच्या पाल्यांसाठी शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. या अंतर्गत २०२४-२५ च्या शैक्षणिक सत्रात पहिल्या प्रयत्नात दहावी किंवा तत्सम परीक्षेत ६० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या पाल्यांना लाभ दिला जाणार आहे. यासंदर्भात एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालकांनी सर्व विभाग नियंत्रकांना सूचना दिल्या आहेत. एसटी महामंडळाच्या २००८ रोजीच्या ठरावानुसार रा. प. कर्मचाऱ्यांच्या पाल्यांसाठी 'कामगार शिक्षण सहाय्य योजनेंतर्गत' वर्ष २०२४-२५ पासून शिष्यवृत्ती आणि उत्तेजनार्थ बक्षीस योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत एसटीत कार्यरत अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून त्यांच्या पाल्यांचे अर्ज मागविण्यात येत आहेत. या योजनेत माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा इयत्ता १० वी किंवा तत्सम परीक्षा मार्च २०२५ मध्ये पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण होऊन किमान ६० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. या योजनेअंतर्गत ३५० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येईल. त्यानंतर उर्वरित अर्जामधून गुणानुक्रमे १०० विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ बक्षिसे दिली जातील. प्रत्येक विभाग, घटकासाठी १० शिष्यवृत्तींची मर्यादा राहील. अर्जासोबत दहावीची प्रमाणित गुणपत्रिका आणि पुढील वर्गासाठी घेतलेल्या प्रवेशाची प्रमाणित पावती जोडणे आवश्यक आहे. यासोबतच इतर बोर्डातील (सीबीएसई, आयसीएसई, आयबी इ.) विद्यार्थ्यांनी ग्रेडेशनचे परावर्तीत गुण दाखवणारी साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. रोजंदार व अर्धवेळ कर्मचाऱ्यांसह सर्व अधिकारी व कर्मचारी अर्ज करण्यास पात्र आहेत.




# पी एम किसान सन्मान निधी योजनेच्या २० व्या हप्त्यानिमित्त किसान गोष्टी कार्यक्रम संपन्न

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पी एम किसान सन्मान निधी योजनेचा २० वा हप्ता देशभरातील शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात आला. यानिमित्ताने दीनदयाल शोध संस्थान कृषि विज्ञान केंद्र अंबाजोगाई, तालुका कृषी अधिकारी कार्यालय अंबाजोगाई व आत्मा बीड यांच्या संयुक्त विद्यमाने किसान गोष्टी या विशेष कार्यक्रमाचे आयोजन डिघोळअंबा केंद्रावर करण्यात आले. कार्यक्रमावेळी आ. नमिता मुंदडा यांची प्रमुख उपस्थिती होती. कृषी उपसंचालक बीड दादाराव जाधवर, उपविभागीय कृषी अधिकारी अंबाजोगाई राहुल गायकवाड, कृषि विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ प्रमुख डॉ. वसंत देशमुख व वैज्ञानिक सल्लागार समिती सदस्य हिंदुलाल काकडे यांची मंचावर उपस्थिती होती. तालुका कृषी अधिकारी अंबाजोगाई रवी मुंडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. ऑनलाइन माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बाराणसी येथून देशभरातील शेतकऱ्यांशी संवाद साधून मार्गदर्शन केले.

शेतकऱ्यांना संबोधित करताना पंतप्रधान म्हणाले की, शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी केंद्र शासन निरंतर प्रयत्न करीत आहे. पीएम किसान योजना शासनाच्या दृढ निश्चयाचे उदाहरण आहे. योजनेचा निधी थेट



शेतकऱ्यांच्या बँक खात्यात हस्तांतरित होत आहे. आगामी काळात 'पीएम धनधान्य कृषी योजना' केंद्र शासन लागू करणार असून २४ हजार कोटी रुपये शेतीच्या विकासावर खर्च करणार आहे. या योजनेचा देशातील कोट्यावधी शेतकऱ्यांना लाभ होईल. शासन शेतकऱ्यांसोबत उभे आहे. हवामान बदलाचे मोठे आव्हान शेतकऱ्यांसमोर आहे परंतु, पंतप्रधान पीक विमा योजनेच्या माध्यमातून मोठी आर्थिक मदत शेतकऱ्यांना दिली असल्याचे त्यांनी सांगितले. देशभरातून ३ कोटी लखपती दीदी तयार करण्याचे उद्दिष्ट केंद्र शासनाने ठेवले असल्याचे त्यांनी सांगितले. सर्वांच्या प्रयत्नानेच विकसित भारताचे स्वप्न साकार होणार असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. केंद्रिय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान पीएम किसान योजनेच्या व्याप्तीवर प्रकाश टाकत म्हणाले, देशभरातील ९.७कोटींहून अधिक शेतकऱ्यांच्या खात्यात थेट २१,५०० कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत.

गेल्या काही वर्षांपासून सरकार शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे आणि हा हप्ता त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा आणखी एक टप्पा आहे. आमदार मुंदडा यांनी उपस्थित शेतकऱ्यांना प्रोत्साहित करताना सांगितले कि, शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा. कृषि विज्ञान केंद्र, कृषी विभाग व आत्मा यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी पूर्ण क्षमतेने प्रयत्न केले जात आहेत. विविध डिजिटल समाजमाध्यमांचा विधायक वापर करून आधुनिक व शाश्वत तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या घरात व बांधावर पोचविले जात आहे. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र शासन शेती आणि शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध आहे. पिकविद्या शास्त्रज्ञ कृष्णा कर्डिले यांनी खरीप हंगामातील पीक व्यवस्थापनावर मार्गदर्शन केले तर डॉ. प्रदीप सांगळे यांनी कीड व रोग नियंत्रणाबाबत शास्त्रीय माहिती दिली. राज्य कृषी विभागाचे सांखिकी तंत्र अधिकारी बीड हर्षवर्धन खेडकर यांनी पी एम किसान योजनेचा लाभ घेण्यासाठी मार्गदर्शन केले.

सहा. कृषी अधिकारी बालाजी केसरे, एस आर अरमुळे, बी एम माचवे यांनी पोक्रा प्रकल्प, एमआरइजीएस उपक्रम, व गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना याची सविस्तर माहिती दिले. कार्यक्रमात सहभागी शेतकऱ्यांना केव्हीकेद्वारे प्रकाशित शेतकरी यशोगाथा पुस्तकाचे वाटप करण्यात आले. तसेच शासकीय योजना, भूमी-सुपोषण, नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन आणि कृषीमधील कृत्रिम बुद्धिमत्ता यासारख्या विषयांवरील विस्तार फोल्डरचेही वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात अंबाजोगाई, केज, परळी व धारूर तालुक्यातील २०० पेक्षा जास्त शेतकरी (पुरुष व महिला) तसेच कृषी महाविद्यालयातील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या. कार्यक्रमाचे संयोजन व संचालन कृषी विस्तार शास्त्रज्ञ सुहास पंके यांनी केले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT